जा. क्र. ५१३/राव्यक-ग्रागृ/बांध/१८
कार्यालय संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष
सिडको भवन, बेलापूर सीबीडी, नवी मुंबई
दिनांक: ०५.०५.२०१८

प्रति,

प्रकल्प संचालक
जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, वर्धा

**विषय: सन २०१८-१९ करीता पंडीत दीनदयाळ उपाध्याय जागा खरेदी योजना अंतर्गत उद्दिष्ट मिळणेबाबत.**

संदर्भ: १. आपले पत्र क्र. ३४६/२०१८ दि. २७.०३.२०१८
२. आपले पत्र क्र. ४८७/२०१८ दि. २०.०४.२०१८

उपरोक्त संदर्भ विषयाच्या अनुषंगाने आपणांस कळविण्यात येते की, पंडीत दीनदयाळ उपाध्याय जागा खरेदी अर्थसाहाय्य योजनेअंतर्गत वर्धा जिल्हयासाठी सन २०१६-१७ करीता अ.जा. १५५, अ.ज. १८, अल्पसंख्याक व इतर १३ असे एकूण १८६ घरकुलासाठी उद्दिष्ट देण्यात आले आहे. प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण व इतर राज्य पुरस्कृत योजनेंतर्गत सन २०१६-१७ वर्षातील लाभधारकासाठी सदरील योजनेतील लाभ दयावयाचा आहे. मात्र आपण संदर्भ पत्र क्र. १ मध्ये नमूद केल्यानुसार सदरील निधी हा सन २०१६-१७ वर्षातील लाभधारका समवेतच सन २०१७-१८ मधील लाभधारकांस देखील उपलब्ध करुन देण्याचे नमूद केले आहे. तसेच या योजनेंतर्गत प्राप्त निधी सन २०१८-१९ वर्षामध्ये खर्च करण्याची परवानगी देखील आपण संदर्भ पत्राद्वारे मागितली आहे.

या अनुषंगाने आपणांस कळविण्यात येते की, पंडीत दीनदयाळ उपाध्याय जागा खरेदी अर्थसाहाय्य योजनेअंतर्गत वर्धा जिल्हयासाठी देण्यात आलेले उद्दिष्ट हे प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण व इतर राज्य पुरस्कृत ग्रामीण गृहनिर्माण योजनेंतर्गत सन २०१६-१७ मधील लाभधारकास अनुज्ञेय आहे. तसेच सदरील निधी खर्च करताना सन २०१६-१७ मध्ये देण्यात आलेल्या संवर्गनिहाय लाभधारकास इत्यादी खर्च अनुज्ञेय करण्यात आला आहे. त्यामुळे सन २०१७-१८ मधील लाभधारकांवर या योजनेतून खर्च करणे अपेक्षित नाही. तसेच सन २०१८-१९ मध्ये देखील खर्च करण्याची परवानगी देण्याचा प्रश्नच उद्भवत नाही.

असे असले तरी, पंडीत दीनदयाळ उपाध्याय जागा खरेदी अर्थसाहाय्य योजनेअंतर्गत उपलब्ध करुन दिलेला निधी सन २०१६-१७ व्यतिरिक्त, सन २०१७-१८ मधील लाभधारक आणि २०१८-१९ मधील लाभधारकावर खर्च करता येईल किंवा कसे याबाबत मा. सचिवांकडून मार्गदर्शन घेण्यात येत असून प्राप्त मार्गदर्शनानुसार आपणास यथावकाश अवगत करण्यात येईल. तोपर्यंत सन १६-१७ मधील दिलेले उद्दिष्ट हे केवळ सन २०१६-१७ लाभधारकास अनुज्ञेय राहील. तसेच संवर्गनिहाय दिलेले उद्दिष्ट देखील त्याचप्रमाणे अनुज्ञेय राहील. यापेक्षा कमी जास्त मंजूरीबाबत संबंधित जिल्हयाची जबाबदारी राहील.

करीता माहिती व पुढील कार्यवाहीस्तव.

(धनंजय माळी भा.रा.से.)
संचालक,
राज्य व्यवस्थापन कक्ष – ग्रामीण गृहनिर्माण,
महाराष्ट्र राज्य

प्रतिलिपी:

१. मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद तथा अध्यक्ष जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा ..... (सर्व) यांना माहितीस्तव
२. प्रकल्प संचालक जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा ..... (सर्व) यांना माहितीस्तव

D/prajakta/Sachin Kulkarni toilet and housing particulars

# जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा,वर्धा

जुनी जिल्हा परिषद इमारत, सामान्य रुग्णालयाजवळ, मेन रोड,वर्धा
पिन कोड-४४२००१ दुरध्वनी व फॅक्स ०७१५२-२४०७०५
ई-मेल drda_wardha@yahoo.co.in

346
936

क्र./प्रसं/जिग्राविय/पंदीदजाख/ 936 /२०१८
दिनांक : २७.०३.२०१८

राज्य व्यवस्थापन कक्ष ग्रामीण गृहनिर्माण
महाराष्ट्र राज्य
आवक क्रमांक - 58
आवक दिनांक - 3-4-2018
शाखा - राज्य योजना
सहाय्यक संचालक (लेखा) उपसंचालक संचालक

प्रति,
मा. संचालक,
राज्य व्यवस्थापन कक्ष,ग्रामीण गृहनिर्माण,
सिडको भवन,५ वा मजला, दक्षिण कक्ष,
सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई

**विषय :- सन २०१८-१९ करिता पंडीत दिनदयाळ उपाध्याय जागा खरेदी योजना अंतर्गत उद्दिष्ट मिळणेबाबत.**

**संदर्भ :** १) आपले पत्र क्र.३१९/पंदिदउघयो/२०१६ दि. ०८/०६/२०१६
२) आपले पत्र क्र. ३१९/लेखा/पंदिउसुउ-५०%/२०१७ दि. २८/०८/२०१७

महोदय ,

प्रधानमंत्री आवास योजना - ग्रामीण अंतर्गत घरकुलासाठी जागा उपलब्ध नसलेल्या कुटूंबांना जागा उपलब्ध करुन देण्यासाठी पंदीत दीन दयाल उपाध्याय जागा खरेदी योजना शासनाकडून राबविली जात आहे. त्या अनुषंगाने संदर्भिय पत्र क्र. १ अन्वये सन २०१५-१६ मध्ये वर्धा जिल्ह्यास एकुण ७० घरकुलांचे उद्दिष्ट देण्यांत आले होते. परंतु त्यावेळी तालुक्यांकडून प्रस्ताव प्राप्त न झाल्यामुळे सदरचे उद्दिष्ट पूर्ण करता आले नाही. त्यानंतर सन २०१६-१७ करिता पुनश्चः सुधारीत उद्दिष्ट प्राप्त झाले ते खालीलप्रमाणे आहे.

| अ.जा | अ.ज. | अल्प संख्या + सर्वसाधारण | एकुण |
|---|---|---|---|
| १५५ | १८ | १३ | १८६ |

त्याअनुषंगाने आतापावेतो खालीलप्रमाणे प्रस्तावांना मंजूरी प्रदान करण्यांत आली आहे.

| अ.जा | अ.ज. | अल्प संख्या + सर्वसाधारण | एकुण |
|---|---|---|---|
| ६ | ९ | २ + ४९ = ५१ | ६६ |

मात्र वरील उद्दिष्टापैकी अल्पसंख्याक + सर्वसाधारण प्रवर्गातील ३८ प्रस्ताव जास्त मंजूर झाले आहेत. तसेच एकुण मंजूरी दिलेल्या प्रस्तावातील सन २०१६-१७ व २०१७-१८ या वित्तिय वर्षात झालेल्या मंजूरीची सद्यस्थिती खालीलप्रमाणे आहे.

| वर्ष | अ.जा | अ.ज. | अल्प संख्या + सर्वसाधारण | एकुण |
|---|---|---|---|---|
| सन २०१६-१७ | २ | १ | १ + ३ = ४ | ७ |
| सन २०१७-१८ | ० | ० | १ + १ = २ | २ |
| एकुण | २ | १ | २ + ४ = ६ | ९ |

त्यामुळे एकुण मंजूर झालेल्या लाभार्थीपैकी खालील लाभार्थींना निधी देण्यास्तव सन २०१८-१९ मध्ये निधी वर्ग करण्याची परवानगी द्यावी.

| अ.जा | अ.ज. | अल्प संख्या + सर्वसाधारण | एकुण | |
|---|---|---|---|---|
| ४ | ८ | ० +४५ =४५ | ५७ | - 'अ' |

तसेच सन २०१६-१७ मधील शिल्लक उद्दिष्ट खालीलप्रमाणे आहे.

| अ.जा | अ.ज. | अल्प संख्या + सर्वसाधारण | एकुण | |
|---|---|---|---|---|
| १४९ | ९ | ० | १५८ | - 'ब' |

येत्या पुढील वित्तीय वर्षाकरीता अंदाजे मागणी - १०० - 'क'

व सद्यस्थितीत **प्रपत्र ब** नुसार तालुकास्तरावरुन जागा उपलब्ध नसलेल्या कुटूंबांची प्रवर्गनिहाय संख्या खालीलप्रमाणे आहे.

| अ.जा | अ.ज. | अल्प संख्या | सर्वसाधारण | एकुण |
|---|---|---|---|---|
| ४०१ | ७३७ | १९७ | १३२७ | २६६२ |

तेव्हा तुर्तास येत्या पुढील वित्तीय वर्षात सन २०१८-१९ करिता उपनिर्दिष्ट **'अ'** प्रमाणे ५७ , **'ब'** प्रमाणे १५८ व **'क'** प्रमाणे १०० असे एकुण **अंदाजे ३१५ घरकुलांचे उद्दिष्ट देण्यात यावे** ही विनंती.

तसेच उपरोक्त मागणी केल्याप्रमाणे ३१५ लाभार्थींना घरकुलासाठी मंजूरी प्रदान करता येईल, असे निश्चीतपणे सांगता येणार नाही, कारण पंडित दीन दयाळ उपाध्याय जागा खरेदी योजनेची प्रक्रिया **प्रपत्र ब** चे प्राधान्यक्रमानुसारच टप्प्या टप्प्याने होत असते. त्यामुळे त्यांचे घरकुलांची मंजूरी सन २०१८-१९ किंवा त्यापुढील वर्षात देखील होईल.

करिता आपले माहिती व कार्यवाहीस्तव सविनय सादर.

प्रकल्प संचालक
**जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, वर्धा**

प्रतिलीपी : 1) मा.आयुक्त नागपूर विभाग नागपूर यांना माहितीकरिता सविनय सादर.
2) मा.मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद वर्धा यांना माहितीकरिता सविनय सादर.

जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, जूनी जिल्हा परिषद इमारत, सामान्य रूग्णालया जवळ, मेन रोड, वर्धा
पिन कोड-442001 दुरध्वनी व फॅक्स- 07152-240705 E-mail- drda_wardha@yahoo.co.in

4187

क्र/प्रसं/जिग्राविवं/पंदीउजाखयो/२८३/२०१८
दिनांक २०/०४/२०१८

प्रति,

मा. संचालक,
राज्य व्यवस्थापन कक्ष- ग्रामीण गृहनिर्माण
सिडको भवन, ५ वा मजला,
दक्षिण कक्ष, सी.बी.डी. बेलापूर,
नवी मुंबई- ४००६१४.

**विषय :- सन २०१८-१९ करिता पंडीत दिनदयाळ उपाध्याय जागा खरेदी योजना अंतर्गत उद्दिष्ट मिळणेबाबत.**

**संदर्भ :-** या कार्यालयाचे पत्र क्र./प्रसं/जिग्राविवं/पंदीदजाख/१३६/२०१८ दि. २७/०३/२०१८

उपरोक्त संदर्भिय पत्राचे अनुषंगाने सविनय कळविण्यांत येते की, पंडीत दीनदयाळ उपाध्याय जागा खरेदी अर्थसहाय्य योजने अंतर्गत वर्धा जिल्हयासाठी सन **२०१६-१७ करीता** अ.जाती- १५५, अ.जमाती- १८, अल्पसंख्यांक + सर्वसाधारण- १३ असे **एकूण १८६** घरकुलांचे उद्दिष्ट प्राप्त झाले होते. त्यापैकी सन २०१७-१८ मध्ये आतापावेतो अ.जाती-१८, अनु.जमाती- १८, अल्पसंख्यांक-२ व सर्वसाधारण प्रवर्ग- ४९ असे **एकूण ८७** प्रस्ताव मंजूर करण्यांत आले. सन २०१६-१७ साठी प्राप्त निधी **रू. ४६.५० लक्ष** पैकी आतापावेतो रू. ३९.३० लक्ष एवढा निधी खर्ची पडला असून रू. ७.२० लक्ष निधी शिल्लक आहे.

तथापि सन २०१६-१७ चे प्राप्त भौतिक उद्दिष्टा पेक्षा आतापावेतो अल्पसंख्यांक + सर्वसाधारण प्रवर्गाचे ३८ प्रस्ताव जास्त मंजूर झाले आहे. सर्व प्रवर्गा मिळून मंजूर झालेल्या प्रस्तावापैकी सन २०१६-१७ व २०१७-१८ मधील मंजूर घरकुले वगळता उर्वरीत घरकुलांकरिताचा निधी सन २०१८-१९ मध्ये वर्ग करण्याबाबत संदर्भिय पत्रान्वये परवानगी मागविण्यांत आली होती. तसेच सन २०१८-१९ करिता सुध्दा उद्दिष्ट मागविण्यांत आले होते.

सद्यस्थितीत सन २०१६-१७ मधील अनु.जातीच्या उद्दिष्टापैकी १३७ घरकुलांचे उद्दिष्ट शिल्लक आहे. परंतु अनु.जमातीचे उद्दिष्ट संपलेले आहे. व इतर प्रवर्ग + अल्पसंख्यांकांचे उद्दिष्टापेक्षा जास्त प्रस्ताव मंजूर झाल्याने अनु.जमाती व इतर प्रवर्गाचे प्रस्ताव मंजूर करण्यांस अडचण निर्माण झाली आहे. सद्यस्थितीत जिल्हास्तारावर ४ अनु.जमाती व ३२ इतर प्रवर्ग + अल्पसंख्यांक असे एकूण ३६ प्रस्ताव उद्दिष्टा अभावी स्थगीत ठेवण्यांत आले आहेत. तेंव्हा आपणांस याद्वारे पुनःश्च विनंती करण्यांत येते की, संदर्भिय पत्राच्या अनुषंगाने कार्यवाही व्हावी.

प्रकल्प संचालक
जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा,
वर्धा

प्रतिलिपी :-
मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प. वर्धा यांना माहितीकरिता सविनय सादर.

(SE-२८७)

राज्य व्यवस्थापन कक्ष ग्रामीण गृहनिर्माण
महाराष्ट्र राज्य
आवक क्रमांक - 481
आवक दिनांक - 3/5/2018
शाखा - S.S.
सहाय्यक संचालक (लेखा) उपसंचालक